महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा, उपसंचालक संवर्गातून सहसंचालक संवर्गात पदोन्नतीने पदस्थापना देण्याकरिता महसुली विभाग पसंतीक्रम मागविणेबाबत.

**महाराष्ट्र शासन**

**वित्त विभाग**

**संचालनालय, लेखा व कोषागारे, महाराष्ट्र राज्य, मुंबई**

क्र.संलेको/प्रशा-राप/का-४/सहसंचालक/२०२६/६९४

तळ मजला, कस्तुरी इमारत, पेट्रोलियम हाऊससमोर, जमशेदजी टाटा मार्ग, चर्चगेट, मुंबई - ४०० ०२०.

दिनांक :- ०२/०६/२०२६

संदर्भ: - अवर सचिव, वित्त विभाग (कोषा. प्रशा.२) यांचे पत्र क्र. संलेको-२०२६/प्र.क्र.४६/कोषा.प्रशा.-२, दि.१९/०५/२०२६

## परिपत्रक :-

महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा उपसंचालक संवर्गातील अधिकाऱ्यांना सहसंचालक संवर्गात पदोन्नतीच्या अनुषंगाने उपरोक्त संदर्भीय शासन पत्राव्दारे कळविण्यात आल्यानुसार, सहसंचालक संवर्गाच्या सन २०२५-२०२६ च्या निवडसूचीमध्ये सोबतच्या यादीतील उपसंचालक संवर्गातील ०६ अधिकाऱ्यांचा समावेश करण्यात आला आहे.

२. सहसंचालक संवर्गातील रिक्त पदांवर निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नती देण्याकरिता सामान्य प्रशासन विभाग, अधिसूचना असाधारण क्रमांक १२० क्र. एसआरव्ही-२०२०/प्र.क्र.४९/कार्या.१२, दि.१४/०७/२०२१ मधील तरतुदी विचारात घेऊन खालील परिच्छेद क्र.४ मधील नमूद अधिकाऱ्यांनी आपला महसुली विभाग पसंतीक्रम सोबत जोडलेल्या विकल्प नमुन्यात आवश्यक कागदपत्रांसह शुक्रवार, दि.०५ जून, २०२६ रोजी सायंकाळी ५:०० वाजेपर्यंत संचालनालयास सादर करावा.

३. हे परिपत्रक संचालनालयाच्या https://www.mahakosh.maharashtra.gov.in/ या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात येत असून त्याकरिता स्वतंत्र पत्र निर्गमित केले जाणार नाही, याची सबंधितानी नोंद घ्यावी. संबंधित अधिकाऱ्यांनी आपले विकल्प प्रत्यक्ष संचालनालय, लेखा व कोषागारे, मुंबई येथे अथवा **jdtransfer2021@gmail.com** याच ई-मेलवर (स्वाक्षरी केलेले विकल्प व कागदपत्रे केवळ PDF स्वरुपातच) विहीत मुदतीत सादर करावेत. संचालनालयाच्या अन्य ई-मेलवर पाठविण्यात आलेले विकल्प विचारात घेतले जाणार नाहीत. ई-मेलव्दारे सादर केलेल्या विकल्पाची मूळ स्वाक्षरीकृत प्रत संचालनालयास तात्काळ सादर करावी. संचालनालयास प्रत्यक्ष प्राप्त होणारा किंवा ई-मेलवर प्राप्त होणारा पहिला विकल्प ग्राह्य धरण्यात येईल; तद्नंतर प्राप्त होणारे विकल्प ग्राह्य धरण्यात येणार नाहीत. तसेच विहित नमुन्यात कोणताही विकल्प न देता प्राप्त होणाऱ्या अथवा विकल्प नमुना स्वाक्षरीकृत न केलेल्या अधिकाऱ्यांच्या बाबतीत प्रशासकीय सोईनुसार महसुली विभाग वाटप करण्यात येईल. **एकदा दिलेला विकल्प कोणत्याही परिस्थितीत बदलता अथवा मागे घेता येणार नाही याची सर्व संबंधित अधिकाऱ्यांनी नोंद घ्यावी.**

४. अधिकाऱ्यांच्या नावाचा तपशिल पुढीलप्रमाणे आहे :

| अ.क्र. | अधिकाऱ्यांचे नाव |
|---|---|
| ०१ | श्री.विक्रमसिंह उज्वलसिंह यादव |
| ०२ | श्री. दत्तदास यशवंत कराडकर |
| ०३ | श्री. चंद्रकांत उत्तमराव पाटील |
| ०४ | श्री. जनार्दन हरी खोटरे |
| ०५ | श्रीम. राजश्री शिवाजीराव पाटील |
| ०६ | श्रीम. प्रगती एकनाथ धनावडे |

(कृ.मा.प.)

५. महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा सहसंचालक संवर्गातील रिक्त पदांची विभागनिहाय स्थिती पुढीलप्रमाणे आहे :

| अ.क्र. | महसुली विभाग | रिक्त पदसंख्या |
|---|---|---|
| १ | नागपूर | ०० |
| २ | अमरावती | ०० |
| ३ | छत्रपती संभाजीनगर | ०० |
| ४ | कोंकण-१ | ०० |
| ५ | नाशिक | ०० |
| ६ | कोंकण-२ | ०६ |
| ७ | पुणे | ०० |

सामान्य प्रशासन विभाग, अधिसूचना असाधारण क्रमांक १२० क्र. एसआरव्ही-२०२०/प्र.क्र.४९/कार्या.१२, दि.१४/०७/२०२१ मधील तरतुदीनुसार महसुली विभाग वाटप करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

रश्मी नांदिवडेकर

(रश्मी नांदिवडेकर)
सहसंचालक (प्रशासन)
संचालनालय, लेखा व कोषागारे, मुंबई

सोबत : विकल्प नमुना

# विकल्पाचा नमुना

**शासन अधिसूचना, सामान्य प्रशासन विभाग क्र.एसआरव्ही-२०२०/प्र.क्र.४९/कार्या.१२, दि.१४ जुलै, २०२१ नुसार विभागीय संवर्गाकरिता द्यावयाचा विकल्प नमुना "ब" (बंधपत्र) (पदोन्नतीने नियुक्ती संदर्भात)**

मी, श्री./श्रीम.________________________________________________,ज्येष्ठता क्रमांक __________, (सध्या कार्यरत कार्यालयाचे नाव) ____________________________________ याद्वारे असे लिहून देतो / देते की, माझा महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा सहसंचालक या पदावर पदोन्नतीच्या निवडसूचीत समावेश असल्याचे मला संचालनालयाचे परिपत्रक क्र.संलेको/प्रशा-राप/का-४/सहसंचालक/२०२६/६९४, दि.०२/०६/२०२६ अन्वये कळविण्यात आले आहे. सदर पदास "महाराष्ट्र शासकीय गट-अ व गट-ब (राजपत्रित व अराजपत्रित) पदावर सरळसेवेने व पदोन्नतीने नियुक्तीसाठी महसूल विभाग वाटप नियम, २०२१" लागू असून माझी महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा **सहसंचालक** पदावर पदोन्नतीने पदस्थापना झाल्यावर या नियमावलीतील तरतुदी मला लागू होणार आहेत.

सदर नियमावलीतील तरतुदींच्या अनुषंगाने मी, सहसंचालक पदावर पदोन्नतीकरिता माझा पहिला पसंतीक्रम #_________________________________ या महसूली विभागासाठी देत आहे.

तसेच - *i) उपरोक्त शासन अधिसूचना दि.१४.०७.२०२१ मधील अ.क्र.७ मध्ये माझे प्रकरण येत नाही.

ii) उपरोक्त शासन अधिसूचना दि.१४.०७.२०२१ मधील अ.क्र.७ मध्ये माझे प्रकरण येत असून त्यापृष्ठ्यर्थ आवश्यक असलेल्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती सोबत जोडल्या आहेत. (जोडलेल्या कागदपत्रांची यादी)

दिनांक :

ठिकाण :

(स्वाक्षरी)

(संपूर्ण नांव - ____________________________)

(भ्रमणध्वनी क्रमांक - ______________________ ___ )

(ई-मेल -________________________________ )

# १) नागपूर, २) अमरावती, ३) छत्रपती संभाजीनगर, ४) कोकण-१, ५) नाशिक, ६) कोकण-२, ७) पुणे यापैकी कोणताही एक महसूली विभाग नमूद करावा.

* लागू नसेल ते खोडावे.